रे.मु.नं. २२७/२०१४
निशाणी ८० खाली

**<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री. बी. ए. नागवडे यांच्यातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर पुढील उलटतपास सुरु.</u>**

हे म्हणणे खरे आहे की, मांदळी येथे माझ्या, माझ्या आईच्या व माझ्या भावाच्या नावे गट नं. २४४ मध्ये ०० हे ८५ आर व ०० हे ०३ आर क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, मांदळी येथे गट नं. २५९ मध्ये माझ्या, माझ्या आईच्या व भावाच्या नावे एकुण क्षेत्र ०० हे १५ आर आहे. मांदळी येथील गट नं. २४४, गट नं. २६६, गट नं. २५९, गट नं. २५०, गट नं. २७० या सर्वांचा खाते नंबर ११६ आहे हे मला सांगता येणार नाही. मी ज्या गटात राहतो तो गट नंबर मला सांगता येत नाही. गट नं. २४४ मध्ये मी कांदा पिकाची नोंद केली काय हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, पिकाच्या नोंदी मोबाईल ॲपद्वारे केल्या जातात. हे म्हणणे खरे नाही की, तशी मी मोबाईल ॲपद्वारे माझ्या तिनही गटातील पिकांची नोंद केलेली आहे. माझा मोबाईल नं. ७०२०७९३४६१ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. २७० मध्ये ३०० ते ३२५ लिंबोनीच्या झाडांची नोंद केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. २५९ मध्ये मी हरभरा पिकाची नोंद केलेली आहे.

माझ्या चुलत्याचे नाव मोहन नाना वाघ असे होते. ते कधी मयत झाले ते सांगता येणार नाही मी लहान होतो त्यामुळे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नानाच्या वाटेचे क्षेत्र माझ्या वडीलांच्या नावे काही व चुलते मोहन यांच्या नावे काही आले. हे मला सांगता येणार नाही की, मोहन यांची पत्नी कमल यांनी ते क्षेत्र गोविंद गांगर्डे यांना विकले. गोविंद गांगर्डे यांनी दि. २९.०९.२०११ रोजी हरिभाऊ वाघ, तात्याभाऊ वाघ व सुभाष वाघ यांना विकले हे मला सांगता येणार नाही. कमल यांनी सदरील विक्री केलेल्या क्षेत्राबाबत आम्ही आजपर्यंत तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, हरिभाऊ वाघ, तात्याभाऊ वाघ व सुभाष वाघ व आमचा एकत्र बांध आहे.

मांदळी गावात एकत्रीकरणाची स्कीम १९८७–१९८८ साली आली का हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, नाना भिवा वाघ, हरिभाऊ भिवा वाघ, काशिनाथ भिवा वाघ व दादा भिवा वाघ यांनी मौजे मांदळी येथील क्षेत्र गट नं. ७०/१अ४, ७३/३/४, ७३/३/९, ७५/२ड, ७६/८, ८५/१/अ, ७०/१अ३, ७३/३/३,

७३/३/८, ७५/२क, ७६/७, ७५/१ब, ७०/१अ२, ७३/३/२, ७३/३/६, ७३/३/७, ७५/२ब, ७६/६, ८५/१क, ७०/१अ१, ७३/३/१, ७३/३/५, ७५/२अ, ७६/५, ८५/१ड या मिळकतीतील वाटप दि. २२.१२.१९८७ रोजी केलेली आहे. काशिनाथ भिवा वाघ व दादा भिवा वाघ यांना कमी क्षेत्र दिले आणि माझे आजोबा नाना भिवा वाघ व हरिभाऊ भिवा वाघ यांना या क्षेत्रामध्ये एक एकर क्षेत्र जास्त दिले हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, नाना, काशिनाथ, दादा, हरिभाऊ यांनी सदर वाटणीपत्रावर साक्षीदारासमक्ष अंगठे केले व त्याच्यावर शंकर केरु भुजबळ व ईतर पंचांचे अगठे आहेत. हे मला सांगता येणार नाही की, सदरचे वाटणीपत्र हे सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी क्र. ४ यांच्यासमोर झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर अधिका–यासमोर माझ्या आजोबांनी सरसनिरस मानाने वाटप झालेली आहे व कोणतीही तक्रार नाही असे लिहुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सव्हे नं. ७३ मधील विहीरीवर जाणेयेणेसाठी सामाईक हक्क पुर्वीप्रमाणे कायम ठेवलेले आहेत असे लिहीलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाटपाप्रमाणे झालेली गट बांधणी मान्य असल्याचे माझ्या आजोबांनी लिहुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांनी सदर वाटपाप्रमाणे गट बांधणी करुन ताबे वहिवाट करीत आहोत हे मान्य केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांच्या नावावर ७/१२ वर क्षेत्र आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे ७/१२ वर आलेले क्षेत्र आम्हाला मान्य नाही याबाबत आम्ही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही आजपर्यंत एकत्रीकरण योजनेची तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या एकत्रीकरण नोंदीप्रमाणे आजही आमच्या वहिवाट आहेत. एकत्रीकरण योजणेप्रमाणे आमच्या वहिवाटी नाहीत याबाबत आम्ही तहसिलदाराकडे तक्रार केलेली नाही. २००९ साली मी १८ वर्षांचा झालो. मी सज्ञान झाल्यानंतर वहिवाटीबाबत तहसिलदाराकडे तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे काही क्षेत्र घोगरगाव येथे देखील होते. हे म्हणणे खरे आहे की, मांदळी आणि घोगरगाव येथील क्षेत्र वडीलोपार्जित होते. हे मला सांगता येणार नाही की, घोगरगाव येथे आमची वडीलोपार्जित जागा आहे. हे मला सांगता येणार नाही की, घोगरगाव येथील वडीलोपार्जित क्षेत्राचा जुना सर्वे नं. १२६/२ हा होता व त्याचा नवीन गट नं. ६२ आहे. हे मला सांगता येणार नाही की, फेरफार नं. ११२७ याने घरातील थोरला मुलगा म्हणुन गट

नं. ६२ ला माझे आजोबा नाना भिवा वाघ यांची नोंद झाली. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नं. १२६/२ यामध्ये काशिनाथ भिवा वाघ, दादा भिवा वाघ व हरिभाऊ भिवा वाघ यांचा देखील हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ६२ मध्ये माझे आजोबा व त्यांचे तिन भाऊ यांच्या तिघांच्याही वाटण्या आहेत व ते आजरोजी वहिवाट करीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ६२ मध्ये दादा भिवा वाघ यांनी एक विहीर पाडलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या क्षेत्रामध्ये दादा भिवा वाघ यांनी कांदा पिकाची लागवड केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, हरिभाऊच्या वारसांनी सदर क्षेत्र गट नं. ६२ मध्ये कांदा पिकाची लागवड केलेली आहे व काशिनाथच्या वारसांनी गव्हाचे पिक लावलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ६२ मध्ये आमचे गव्हाचे पिक आहे. गट नं. ६२ च्या चतुःसिमा मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी गट नं. ६२ मध्ये कधीच गेलो नाही. हे मला सांगता येणार नाही की, गट नं. ६२ ला चारही बाजुंनी रस्ते आहेत. मी जो गहु पेरला आहे त्याच्या पश्चिमेला खंडु वाघ यांचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ६२ बाबतचा आमचा वाद गावातील प्रतिष्ठीत लोकांनी मिटवला होता. हे म्हणणे खरे नाही की, वहिवाटीप्रमाणे आम्हाला गट नं. ६२ मधील क्षेत्र वादींना द्यायला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ६२ मधील क्षेत्र आमच्या आजोबांच्या व आजोबांनंतर वडीलांच्या नावे व वडीलांनंतर आमच्या नावे आल्यामुळे आम्ही वादी यांच्या नावावर करुन देत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घोगरगाव येथील ग्रामपंचायत मिळकत १०६ ही आमच्या आजोबांच्या नावे होती व त्यानंतर वडीलांच्या नावे आली व वडीलांनंतर ती आमच्या नावे आली आहे त्यामुळे ती आम्ही वादींना वाटुन देत नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2026.04.02 17:12:06 +0500

**( आर. बी. खवले )**

दि. ०२.०४.२०२६

२रे सह दि.न्या.क. स्तर,श्रीगोंदा,

जि.अहमदनगर